रविवार
पुण्य नगरी
● वर्ष : १ ● अंक : १५८ ● पुणे, रविवार, १३ एप्रिल २००८ ● पाने ८+४=१२, किंमत २.०० रुपये

पुरुषां

**शरीरावरील पांढऱ्या डागामुळे आयुष्याचा आनंद हरवून जातो. कोणत्याही वयोगटातील व्यक्तिला ल्यूकोडर्मा अर्थात पांढऱ्या डागांचा सामना करावा लागू शकतो. पारंपरिक उपचारपद्धतीमध्ये त्यासाठी स्टेरॉईडस् दिली जातात. पण त्याचे अनेक दुष्परिणामही आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबईच्या डॉ. राजेश शाह यांनी ल्यूकोडर्मावर होमोओपॅथीद्वारे यशस्वी उपचार केले आहेत. त्याविषयी माहिती देणारा लेख.**

# कहाणी 'महाश्वेता'ची

आरोग्यमंत्र

**– संजय जोशी**

एके काळी दूरदर्शनवर सुरू असलेल्या 'महाश्वेता' या मालिकेने प्रचंड लोकप्रियता मिळवली होती. या मालिकेत अंगावर पांढरा डाग असलेल्या स्त्रीच्या संसारात निर्माण झालेली वादळं रंगवण्यात आली होती. काही वर्षांपुर्वीपर्यंत आपल्याकडे पांढरे डाग अंगावर येणे पूर्वजन्मीचे पाप मानले जात असे. त्याविषयी चार–चौघात बोलणंही टाळलं जात असे. या व्याधीचा सामना करणारी व्यक्ती समाजापासून, कुटुंबियांपासूनही दुरावत असे. आजही परिस्थिती फारशी बदललेली नाही, पण अंगावर पांढरे डाग असणाऱ्यांना किमान उपचार मिळू लागले आहेत. या व्याधीवर सातत्याने संशोधन करणारे डॉ. राजेश शाह अशा रुग्णांवर उपचार करत आहेत.

भारतामध्ये ल्यूकोडर्माची समस्या असलेल्या रुग्णांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ८ टक्के इतके आहे. डॉ. शाह यांच्याकडे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये सर्व वयोगटातील स्त्री–पुरुषांचा समावेश आहे. एखाद्याच्या कुटुंबात असा आजार असेल तर तो पुढच्या पिढीत संक्रमित होऊ शकतो. अर्थात प्रत्येक वेळी असे होईलच, असे नाही. कुटुंबात एखाद्याला थायरॉईडस्, मधुमेह, कर्करोग, चाई (अ‍ॅलोपेशिया एरीयाटा) असे विकार असतील तरीही पुढच्या पिढीत ल्यूकोडर्मा होण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे सातत्याने वेगवेगळ्या केमिकल्सशी (रसायन) संपर्क आल्यानेही ही समस्या निर्माण होऊ शकते. ल्यूकोडर्मा अर्थात पांढरे डाग ही 'व्याधी' नव्हे तर पेशींमधील 'विकार' आहे. आपल्या शरीरातील पेशी यंत्रणा इतर पेशींवर शत्रू समजून हल्ला करते, त्यावेळी अशा प्रकारची त्रुटी निर्माण होते. त्याला ऑटो इम्युम डिसीज असे म्हणतात. या प्रक्रियेत मिलोनोसाईट हे रंगद्रव्य तयार करणाऱ्या पेशींचा नाश व्हायला सुरुवात होते. या पेशींमुळे त्वचेला रंग येत असतो. मात्र त्या नष्ट होऊ लागल्याने रंगनिर्मितीची प्रक्रिया थांबते आणि त्वचेचा रंग पांढरा दिसू लागतो. यामध्ये त्वचेचा नैसर्गिक रंग हरपतो आणि छोट्या किंवा मोठ्या ठिपक्यांपासून पांढरे डाग निर्माण होण्यास सुरुवात होते.

काहींना तोंडाजवळ, डोळ्याजवळ किंवा हाताच्या बोटांजवळ असे डाग येऊन हळूहळू इतरत्र पसरायला सुरुवात होते. ॲलोपॅथीमध्ये यावर विविध उपचार असले तरी त्याचे दुष्परिणामही मोठ्या प्रमाणावर आहेत. या पार्श्वभूमीवर होमीओपॅथीमध्ये असलेले उपचार अधिक लाभदायक आहेत. या उपचारांमुळे डाग पसरण्याची प्रक्रिया थांबते आणि त्वचेला पुन्हा मूळ रंग यायला सुरुवात होते. डाग यायला सुरुवात झाल्यानंतर लगेचच उपचार घेतल्यास अधिक फायदा होतो. तथापि ते जुने आणि मोठ्या प्रमाणावर पसरले असल्यास होमीओपॅथीच्या उपचारांमुळे पसरण्याची प्रक्रिया थांबते. अर्थात असे जुने डाग पूर्णपणे बरे होतीलच, याची हमी देता येत नाही.

अशा रुग्णांचे डाग पसरण्याचे प्रमाण कमी झाले तरी बरेच साध्य होण्यासारखे असते. अर्थात संपूर्ण शरीरावर डाग आलेल्या आणि त्यातूनही बरे झालेल्या रुग्णांचीही काही उदाहरणे आहेत. दिल्लीतील एका युवकाला अशाच प्रकारची समस्या होती. त्याने डॉ. शाह यांच्याकडे दोन ते तीन वर्षे उपचार घेतले. त्याच वेळी त्याने लाईट ट्रीटमेंटही घेतली. यामुळे त्याच्यामध्ये आश्चर्यकारक बदल आढळले. खरे तर या विकारामुळे शरीराच्या कोणत्याही भागावर दुष्परिणाम होत नाही. तसेच हा विकार संसर्गजन्यही नाही. मात्र त्यामुळे एकूणच व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडत असल्यामुळे त्याला काही सामाजिक पैलू आहेत. याबाबत गैरसमज असणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. सर्दी–तापापेक्षाही हा विकार कमी त्रासदायक आहे. समाजात वावरताना व्यक्तीमत्त्वाला अनन्यसाधारण महत्त्व असतं. या पार्श्वभूमीवर चेहरा किंवा अन्य दर्शनी भागावर पांढरे डाग निर्माण झाल्यास नैराश्य येते, आत्मविश्वास कमी होतो. अशा रुग्णांना समुपदेशन करून मनोबल वाढवण्याची आवश्यकता असते.

काही वर्षांपुर्वीचा एक रुग्णानुभव डॉक्टर सांगतात. त्यांच्याकडे एक उद्योजिका आली होती. शरीरावर पांढरे डाग आल्यामुळे ती खूपच खचली होती. डाग येणे ही काही फार मोठी गोष्ट नाही, तो कशामुळे येतो, त्यावर कशा प्रकारचे उपचार उपलब्ध आहेत हे सांगून हा विकार स्वीकारुनही आनंदी जीवन कसं जगता येईल याविषयी डॉक्टरांनी तिला समुपदेशन केले. पुढच्या वेळी भेटायला आली असता या स्त्रीमध्ये बरीच प्रगती आढळून आली. सोरायसीसप्रमाणेच ल्यूकोडर्मा या त्वचाविकाराचाही मानसिकतेशी जवळचा संबंध आहे. हा विकार बळावण्याला अतिमानसिक ताण हे ही कारण सांगितले जाते. त्यामुळे नेहमी सकारात्मक दृष्टीकोन बाळगणे आवश्यक असल्याचे डॉ. शाह सांगतात. डाग उमटलेल्या ठिकाही तीव्र प्रकाशकिरण टाकण्याची उपचारपध्दत राबवली जाते. त्याचाही चांगला फायदा होतो. अशा प्रकारची समस्या असणाऱ्या रुग्णांनी मासे, खेकडे किंवा समुद्रापासून मिळणारे खाद्यपदार्थ सेवन करणे टाळावे. त्याचप्रमाणे आंबट पदार्थही सेवन करु नयेत. चिंच, लोणचे, आंबा, संत्रे, बोर असे आंबट पदार्थ खाऊ नयेत. ते खाल्ल्याने डाग वाढण्याची शक्यता असते.

तरुणांना हा विकार जडल्यास विवाह ठरण्यामध्ये अडथळे येतात. त्यामुळे एखादा डाग दिसल्यानंतर त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा. शरीरावर कोणत्याही प्रकारचा डाग आढळला तरी त्याची शहानिशा करुन घ्यावी. काही वेळा डोळ्यांना सहज दृष्टीस पडणार नाही, अशा ठिकाणी डाग पडतात. त्याची जाणीव झाल्यानंतर त्वरीत उपचार सुरू करावेत. अधिक माहितीसाठी डॉक्टरांशी (०२२)६७९७८२८९/ किंवा ९२२१०००२६३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.

उपचारापूर्वी



उपचारानंतर

